# ७. नृत्य

## ७.१ भरतनाट्यम् (दक्षिण भारत)

भरतनाट्यम हे मूळ दक्षिण भारतातील शास्त्रीय नृत्य असून आजकाल ते संपूर्ण भारतात लोकप्रिय आहे. हे शास्त्रीय नृत्य मूळात देवदासी करत असत. उत्तरेच्या मानाने दक्षिण भारतावर परकीय आक्रमणे कमी झाल्यामुळे दक्षिणी संगीतावर त्याचा परिणाम फारसा झाला नाही. त्यामुळे भरतनाट्यमचे मूळ रूप, त्याची प्राचीन प्रणाली आजही शुद्ध स्वरूपात पहायला मिळते. या नृत्य प्रकारात शास्त्रीय मुद्रांचा अधिक उपयोग केला जातो. त्यात किरकोळ कथाही सापडतात, पण कथ्थक नृत्याप्रमाणे यामध्ये कथानक नसते. भरतनाट्यम या नृत्यासाठी खास करून मृदंगम, बासरी, व्हायोलिनची साथ असते आणि त्याच्या जोडीला कर्नाटकी गीते गायली जातात. वाद्यांवरही कर्नाटकी सुरावट असते. भरतनाट्यम या नृत्यप्रकारात कर्नाटकी संगीताचा वापर केला जातो.



### नृत्याचा क्रम :

भरतनाट्यम् या नृत्यप्रकाराचे मुख्यतः सात भाग पडतात, त्या भागांना मार्गम् असे म्हणतात. १) अल्लारिपू २) जतिस्वरम् ३) शब्दम् ४) वर्णम् ५) पदम् ६) तिल्लाना ७) श्लोकम्

### भरतनाट्यम्‌ची वेशभूषा :

या नृत्यप्रकारात महाराष्ट्रीयन नऊवारीसारखी दिसणारी साडी नेसतात. साडी शिवलेली असते. दोन्ही पायांच्यामध्ये चुणीदार पंखा असतो. अंगावरून दुपट्ट्याचा पदर घेतलेला असतो व तो पाठीमागून कमरेला खोचलेला असतो. अर्ध्या हातांच्या बाह्यांचे ब्लाऊज असते. संपूर्ण वेशभूषेचे कापड जरीकाठांचे, रेशमी किंवा कांजीवरमचे असते. कमरपट्टा, गळ्यात व कानात आभूषणे, भांगामध्ये बिंदी, डोक्यावर खड्यांचे चंद्र आणि सूर्य, केसांची सुरेख रचना लांब वेणीच्या रूपात करतात. वेणीवर गजरा व भरपूर फुले लावून वेणीची आकर्षकता वाढवली जाते. स्त्रीच्या रूपाला पावित्र्य, मोहकता आणि बांध्याला उठाव देणारी अशी ही वेशभूषा असते. छानसा मेकअप (रंगभूषा) असतो.

अलीकडे भरतनाट्यम्‌मध्ये जावली हाही एक प्रकार सादर करतात. यातील शृंगार सर्वसामान्य माणसास समजणारा असतो. नायक-नायिका सर्वसामान्य जनतेचे प्रतिनिधित्व करतात. नटनममध्ये नटराजाची स्तुती असते.

## ७.२ कुचिपुडी

कुचिपुडी हे आंध्रप्रदेशातील एक पारंपरिक नृत्य नाट्य आहे जिचा आज शास्त्रीय नृत्य शैली म्हणून बराच विकास झाला आहे. आंध्रप्रदेशात कुचिपुडी नावाचे गाव असून हे संपूर्ण गाव गेल्या अनेक वर्षांपासून 'कुचिपुडी' नृत्यशैलीची साधना करीत आहे.

कुचिपुडी या नृत्यशैलीचा विकास कृष्णदेव आर्य यांच्या काळात झाला. वैष्णव भक्तीने ओतप्रोत भरलेला हा नृत्यप्रकार असून सहाव्या शतकातील भक्ती संप्रदायाची चळवळ पुढे नेण्यात या कला प्रकाराचे विशेष योगदान आहे. कुचिपुडी या गावात रामायणातील कथा या गीत, नृत्य आणि अभिनयाच्या माध्यमातून सादर करणारे नट समूह आहेत. त्या समूहाला 'कुलशीव' असे म्हणतात. यामध्ये अधिकतर पुरुष पात्राचा सहभाग असतो. भरतनाट्यम् आणि ओडिसी नृत्यशैलीचा समन्वयही या नृत्यप्रकारात साधला गेलेला दिसतो. सतराव्या शतकात सिद्धेंद्र योगी यांनी कुचिपुडी गावातील युवकांना बरोबर घेऊन हा नृत्यकलाप्रकार जगासमोर आणला.



हिंदू धर्म आणि त्यातील पौराणिक कथा यांची परंपरा जतन करून ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य या नृत्यशैलीने केले आहे.

या नृत्यशैलीमध्ये 'शब्दम' या प्रकाराची प्रधानता असते. भरतनाट्यमप्रमाणेच यात तिल्लाना हा प्रकारही सादर होतो. पदलालित्य हे या शैलीचे महत्त्वाचे अंग मानले जाते. नृत्याच्या शेवटी कलावंत थाळीमध्ये नर्तन करतो. हे नृत्य स्वतंत्र आणि लयदार पद्धतीने केले जाते. लास्य आणि तांडव या दोन्हीचे मिश्रण यात असते. प्रत्येक नर्तक हा तालाच्या साथीने नृत्य करत रंगमंचावर प्रवेश करतो. ह्या नृत्य शैलीवर संस्कृत कवी जयदेव यांच्या गीतगोविंद या काव्याचा प्रभाव जाणवतो.

विजयनगर साम्राज्याचा राजा कृष्णदेवराय याने या नृत्याला प्रोत्साहन दिले.

या नृत्यासाठी नर्तक वापरत असलेला पोषाख हा भरतनाट्यम नृत्यशैलीच्या पोषाखासारखाच असतो. अंगसंचालन स्प्रिंगप्रमाणे वरखाली पद्धतीने असल्याने शरीरातील प्रत्येक भागावर अधिक मेहनत घेणे गरजेचे असते.

कुचिपुडी हे मुख्यतः नाट्य असल्यामुळे यात नृत्याबरोबर अभिनयाला अधिक प्राधान्य दिले जाते.

## ७.३ लावणी

लावणी हा महाराष्ट्राच्या लोकनृत्यांमधील महत्त्वाचा नृत्यप्रकार आहे. तर 'लवण म्हणजे सुंदर' लवण या शब्दावरून लावण्यगीत वा लावणी शब्द तयार झाला आहे.

लावणी हा कलाप्रकार शृंगार, वीरता वा भक्ती या रसांचा परिपोष करण्यासाठी पूरक असे माध्यम समजला जातो. 'लास्य' रसाचे दर्शन घडवणारी लावणी हा महाराष्ट्रातील अतिशय लोकप्रिय लोककला प्रकार आहे. लास्य रस म्हणजे शृंगाराचा परिपोष असणारा रस होय. लावणी म्हणजे गीत, नृत्य आणि अदाकारी (नृत्यातील भाव) यांचा त्रिवेणी संगम. लावणीच्या साथीला तुणतुणे, ढोलकी व पायपेटी ही वाद्ये प्रामुख्याने वाजवली जातात.



लावणीच्या उत्पत्तीविषयी दोन स्वतंत्र विचार प्रवाह आहेत. लावणीचे मूळ हे संतांच्या विराण्या, गवळण, अभंग यात दिसते. संतांचे संस्कार घेऊन शाहीरांनी ज्या विविध रसांच्या रचना केल्या त्यात लावणीचा समावेश होता. महाराष्ट्रातील संतांचे संस्कार हे तंतांवर (शाहीरांवर) होते. बाराव्या तेराव्या शतकात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतात जी अध्यात्मिक क्रांती झाली त्या क्रांतीपर्वात अनेक संत उदयाला आले. ते भिन्न जातीपातीचे होते. संताचा हा कार्यकाळ थेट सतराव्या शतकापर्यंतचा मानला जातो. त्यानंतर तंतांचा उदय झाला. ज्यात प्रभाकर, रामजोशी, सगनभाऊ, हैबती, अनंत फंदी आदींचा समावेश होता. या शाहीरांनी अनेक गण, लावण्या रचल्या त्या सर्व लावण्या शृंगारिक होत्या असे नव्हे तर वीररस प्रधान व वात्सल्यप्रधानही होत्या. विसाव्या शतकात पठ्ठे बापूराव, भाऊ फक्कड, अर्जुना वाघोलीकर, हरि वडगावकर, दगडू बाबा साळी, कवी बशीर आणि मोमीन कवठेकर आदी कलावंतांनी गण, गवळण, लावण्या अशी कथागीते रचली. या कथागीतांचीच पुढे वगनाट्ये झाली. लावणीकार बशीर, मोमीन कवठेकर यांनी तब्बल पन्नास वर्षे तमाशा सृष्टीला आपल्या लेखणीतून विविध प्रकारचे मनोरंजनात्मक साहित्य पुरवले. लावणी, गण, गवळण, पोवाडे, सवाल-जवाब आणि वग नाट्य अशा

सर्व प्रकारच्या लेखातून त्यांनी भरीव असे योगदान दिले आहे. 'भृंगावती' गेय रचना म्हणजे लावणी. लावणी म्हणजे चौकाचौकात पदबंध लावत जाणे. कृषिप्रधान संस्कृतीत श्रमपरिहारासाठी जी गीते गायली जातात. त्यांची जातकुळी लावणीसारखीच असते. लावणी शब्दांचे साधर्म्य कृषि संस्कृतीतील पेरणी, लावणीशी देखील जोडले जाते. संत साहित्यानंतरचा काळ हा लावणीचा उदय काळ मानला जातो.

**वेषभूषा :**

लावणी नृत्यासाठी महाराष्ट्रातील परंपरेनुसार चालत आलेली नऊवारी साडी, विविध भरगच्च अलंकार, कमरपट्टा बिंदीसह पायात घुंगरू आणि केसांचा अंबाडा व त्यावर गजरा अशी वेशभूषा दिसून येते.

**लावणीचे मुख्यत : तीन प्रकार पडतात.**

१. नृत्यप्रधान लावणी

२. गानप्रधान लावणी

३. अदाकारी प्रधान लावणी

प्रारंभ काळात लावणी गेय स्वरूपात माहीत होती. नृत्यप्रधान लावणी हे अगदी अलीकडच्या काळातील रूप होय. जुन्नरी, हौद्याची, बालेघाटी, छक्कड, पंढरपुरी बाजाची अशी लावणीची विविध रूपे होत. जुन्नरी व हौद्याची लावणी प्रामुख्याने ढोलकी फडाच्या तमाशात सादर होते. बालेघाटी लावणी ही रागदारी थाटाची विलंबित लयीची लावणी होय. संगीत नाटक अकादमी पुरस्कार विजेत्या सत्यभामाबाई पंढरपूरकर यांनी पंढरपुरी बाजाच्या लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. छक्कड म्हणजे द्रुत लयीतील उडत्या चालीची लावणी. यमुनाबाई वाईकर यांनादेखील लावणीतील विशेष योगदानाबद्दल संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांनी बालेघाटी लावणीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

भारत नृत्य महोत्सवात पॅरिसला माया जाधव यांनी लावणी सादर केली त्यामुळे लावणीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त झाली. 'सुंदरा मनामध्ये भरली' हा लावणीवर आधारित कार्यक्रम अमेरिकास्थित मराठी कलावंत डॉ. मीना नेरूरकर यांनी सादर केला. त्यामुळे लावणीकडे अभिजनवर्ग वळला हे जरी खरे असले तरी गावोगावच्या जत्रांमधून, उत्सवांमधून लावणी पिढ्यानपिढ्या जनसामान्यांचे मनोरंजन करीत असल्याचे आजही आपल्याला दिसून येते.

### ७.४ भांगडा

भांगडा हे राष्ट्रीय ख्यातीचे लोकनृत्य आहे. भांगडा नृत्याचे उगम स्थान हे ल्यालपूर आहे. पीक आल्यानंतर पंजाबमध्ये लोक मोठ्या आनंदाने त्याचे नाचून स्वागत करतात आणि काही ठिकाणी तर शेतीच्या हंगामात गव्हाची पेरणी झाल्यापासून ते कापणी व मळणी होईपर्यंतच्या कालावधीत रोज रात्री सर्व जण मिळून हे नृत्य करतात. वैशाखी यात्रेबरोबर भांगड्याचा मौसम संपतो. उत्तम पिकाच्या आनंदाप्रीत्यर्थ किंवा विवाहासारख्या मंगलप्रसंगी हे नृत्य करण्याचा प्रघात रूढ आहे. गावातील युवक पौर्णिमेच्या रात्री एखाद्या शेतात एकत्र जमून ढोलाच्या तालावर हे नृत्य करतात. सळसळणारा चैतन्यपूर्ण जोम व उत्कट आनंदाचा प्रत्यय या नृत्यातून पहावयास मिळातो. पंजाबच्या सुफल-समृद्ध संस्कृतीचे प्रतिबिंब या नृत्यातून दिसून येते. पंजाबमधील सर्व लोकनृत्यात भांगडा हे फार लोकप्रिय, ओजस्वी आणि स्फूर्तिदायक लोकनृत्य मानले जाते .

**वेषभूषा :**

रंगीबेरंगी लुंग्या, पगड्या किंवा फेटे, हातात रुमाल, पायात पंजाबी जोडे (खुस्से), झब्बा, त्यावर जरीचे जाकीट अशी वेशभूषा करून व हातातील काठीला घुंगरू बांधून हे नृत्य करतात. काही नर्तक नाचतानाचता ढोल वाजवणाऱ्याच्या जवळ जाऊन पंजाबी लोकगीतांतील कडवी, उंच किंवा चढत्या स्वरात म्हणतात. या गाण्याच्या ओळीनंतर पुन्हा जोरदार नृत्य सुरू होते. अत्यंत उत्साहपूर्ण असे भांगडानृत्य सर्वांनाच आकर्षून घेते.

हे नृत्य करत असताना ढोलवादक हा मधोमध उभा असतो. इतर नर्तक त्याच्याभोवती वर्तुळाकार नृत्य करतात. मूळात हे समूहनृत्य असल्याने याला विशिष्ट नर्तनसंख्येचे बंधन नाही. नृत्यातील थकवा थोडासा दूर होऊन नृत्यात रंग भरावा किंवा स्फूर्ती मिळावी म्हणून 'हडिप्पा', 'बल्ले बल्ले', 'ओ बले बले' अशा जोशपूर्ण आरोळ्या देऊन हातात काठ्या



घेऊन, खांदे मोठ्या आकर्षकपणे उडवून, बोटाला हातरुमाल बांधून आणि उड्या मारून अनेक आकर्षक कसरती करत टाळ्या वाजवत हे नृत्य करतात.

प्रत्येक नृत्य हे गीताशी जोडलेले असते. पण नृत्याची रंगत वाढवण्यासाठी बरेचदा केवळ तालवाद्याच्या साथीवरही हे नृत्य केले जाते. या नृत्याला स्वतंत्र गायकाची जरूर नसते. एक नर्तक समोर येऊन आवेशपूर्ण ढंगामध्ये गाणे म्हणतो. या गीतामध्ये प्रेम, आनंद या भावनांबरोबरच कित्येकदा दुःख आपत्तीचेही चित्रण असते. रंगमंचावर हे नृत्य सादर करताना प्रथम ढोलवादक येतात व मागून नर्तक येतात. गळ्यात ढोल अडकवलेला वादक मध्यभागी उभे राहून दोन काठ्यांनी ढोल वाजवतो. त्याच्या दोन्ही बाजूंनी पारंगत नर्तक उभे राहून ते संपूर्ण नृत्याचे नेतृत्व करतात. ते मधूनमधून हाताचा पंजा कानावर ठेवून पुढे सरसावून पारंपरिक पंजाबी लोकगीतातील बोली अथवा ढोला देतात. ह्यावेळी नृत्यात काहीसा खंड पडतो व त्यानंतर पुन्हा जोमाने नृत्य सुरू होते. कित्येकदा एखाद्या नर्तकाच्या हातात लांब काठी असून तिच्या टोकावर अनेक रंगांनी सुशोभित केलेली लाकडी चिमणी बसवलेली असते. नर्तक तिची मान व शेपूट दोरीच्या साहाय्याने नृत्याच्या तालावर वर खाली करतो. त्यामुळे या नृत्याला किंचित विनोदाची झालर प्राप्त होते. हे लोकनृत्य असल्याने परंपरागत शरीर हालचालीखेरीज इतरही उत्स्फूर्त हालचाली करण्याचा प्रघात दिवसेंदिवस रूढ होत चाललेला आहे. हे मूलतः पुरुषी नृत्य असले तरी अलीकडे महिलांचाही त्यात सहभाग दिसतो. पुरुषी भांगडा नृत्यातील चैतन्य व जोम स्त्रियांच्या गिद्धा नामक नृत्यप्रकारातही दिसून येतो.

**भारतातील नृत्यप्रकार कथकली (केरळ)**

कथकली हे नृत्य दक्षिण भारतातील एक प्राचीन शास्त्रीय नृत्य आहे. केरळमध्ये या नृत्याचा विशेष प्रसार आढळतो. यामध्ये संगीत, अभिनय आणि कथानक यांचा सुरेख समन्वय साधलेला असतो. कथकलीमध्ये २० ते २२ कलाकारांचा एक संच असतो. त्यात गायक, वादक, रंगभूषाकारही (मेकअपमॅन) असतात. या नृत्यातून रामायण, महाभारत किंवा इतर कोणत्याही पौराणिक कथेचे सादरीकरण केले जाते. नर्तक स्वतः काही बोलत नाही. ज्या पात्रांचा संवाद असेल ते रंगमंचावर येऊन अभिनयातून संवाद व्यक्त करतात. सोबत गायल्या जाणाऱ्या संगीतबद्ध कवितांनुसार भावप्रदर्शन केले जाते.



## स्वाध्याय

**प्र.१ आधुनिक दृकश्राव्य साधनांचा वापर करून विविध नृत्यप्रकार प्रत्यक्ष बघून त्यांची वैशिष्ट्ये समजून घ्या.**

**प्र.२ विविध नृत्यप्रकारांसाठी आवश्यक असलेल्या वेशभूषेचे इंटरनेटद्वारे निरीक्षण करा.**

**प्र.३ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

(१) भरतनाट्यम् नृत्याचा क्रम लिहा.

(२) लावणीचे मुख्य तीन प्रकार कोणते ?

(३) भांगडा या नृत्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

**उपक्रम : इंटरनेटच्या सहाय्याने भरतनाट्यम्, कुचिपुडी, लावणी, भांगडा इत्यादी कलाकारांची अधिक माहिती मिळवा, तसेच परिसरातील प्रसिद्ध कलाकारांच्या मुलाखती/भेटी घ्या.**